# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांकः31.08.2026** **वारःसोमवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उझबेकिस्तानचा सर्वोच्च सन्मान प्रदान
2. 26 व्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी किर्गिझस्तानमध्ये दाखल
3. भारताचा विकासदर पुढील आर्थिक वर्षात 7 टक्क्यांपेक्षा अधिक राहील असा अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचा विश्वास
4. नेपाळमध्ये पूरबळींची संख्या 794 वर; पुन्हा पुराचा इशारा आणि
5. महिलांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत थायलंडचा पराभव करत भारताची विजयी सलामी

**<u>पंतप्रधान</u>**

किर्गिझस्तानमध्ये होणाऱ्या 26 व्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी किर्गिझिस्तानच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर काल बिश्केक इथं पोहोचले. आज आणि उद्या किर्गिझस्तानमध्ये ही शिखर परिषद होत आहे. पंतप्रधान मोदी उद्या राष्ट्रप्रमुखांच्या सत्राला उपस्थित राहतील. किर्गिझस्तानमध्ये पोहोचल्यावर विमानतळावर त्यांचं जल्लोषात स्वागत करण्यात आलं.

शांघाय शिखर परिषदेसाठी राष्ट्राध्यक्ष सादिर झापारोव्ह यांच्या निमंत्रणावरून मोदी किर्गिझस्तानच्या भेटीवर गेले आहेत. तत्पुर्वी भारत आणि उझबेकिस्तान दरम्यान 'सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी'च्या पातळीवर नेण्याचा निर्णय काल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्राध्यक्ष शावकत मिर्झियोयेव्ह यांच्या चर्चेनंतर घेण्यात आला. यावेळी पंतप्रधानांना उझबेकिस्तानचा सर्वोच्च राज्य सन्मान 'ऑर्डर ऑफ ओलि दराजली दोस्तलिक' प्रदान करण्यात आला. द्विपक्षीय संबंधांना बळकटी देण्यासाठी खनिजं आणि युरेनियम तसंच विविध क्षेत्रातील व्यापार, संरक्षण, डिजिटल पेमेंट्स आणि शिक्षण अशा 11 करारांवर यावेळी स्वाक्षरी करण्यात आली. मध्य आशियाई देशात हिंदी भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी, मोदींनी उझबेक विद्यार्थ्यांसाठी 100 'लाल बहादूर शास्त्री शिष्यवृत्ती' आणि ताश्कंद स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ ओरिएंटल स्टडीजमध्ये 'संस्कृत मंचा'ची स्थापना करण्याची घोषणा यावेळी केली.

**मन की बात**

विकसित भारतासाठी नशामुक्त युवा ही मोहीम म्हणजे देशातल्या युवा पिढीच्या आरोग्य, आनंद आणि उज्ज्वल भविष्याचा एकत्रित निर्धार आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते काल आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमात बोलत होते. जास्तीत जास्त संख्येनं युवक युवती यामध्ये सहभागी होत आहेत याचं आपल्याला समाधान आहे असं मोदी म्हणाले. आगामी सणासुदीच्या काळात नागरिकांनी स्थानिक उत्पादनांच्या खरेदीला प्राधान्य द्यावं असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज नवी दिल्ली इथं 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी'च्या संयुक्त दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार आहेत. देशभरातील 18 'एनआयएफटी' संस्थेतील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाणार आहे. या प्रसंगी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह हे देखील उपस्थित असतील.

**सीतारमण**

2026-27 या आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक विकास दर 7 टक्के किंवा त्याहून अधिक राहण्याची शक्यता आहे. असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे, अमेरिकेच्या दौऱ्यावर शिकागो इथं भारतीय समुदायाला संबोधित करताना त्या बोलत होत्या. अमेरिका-इराण संघर्ष आणि होर्मुझची सामुद्रधुनी बंद पडल्यामुळे निर्माण झालेली भू-राजकीय अनिश्चितता आणि पुरवठा साखळीतील व्यत्यय असूनही भारत आपली विकासाची गती कायम राखेल. दरम्यान G20 आणि संबंधित बैठकांमध्ये सहभागी होण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज दक्षिण कॅरोलिना इथं पोहोचल्या आहेत. आज आणि उद्या  ॲशविले इथं ही  बैठक होत आहे.

**नीट-परिक्षा**

पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी NEET-PG साठी काल झालेली परिक्षेचा पेपर जयपूरमध्ये परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटल्याचा दावा करणारी समाजमाध्यमावरील संदेश दिशाभूल करणारा असल्याचं केंद्र सरकारनं स्पष्ट केलं आहे. कोणतीही प्रश्नपत्रिका फुटलेली नाही असंही परिक्षा विभागानं सांगितलं आहे. राजस्थानमधील जयपूर इथं सीतापुरा परीक्षा केंद्रांवर अंतर्गत वीजपुरवठ्यातील समस्यांमुळे तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. या केंद्रावरील प्रभावित विद्यार्थ्यांसाठी परीक्षा पुढील महिन्याच्या 5 तारखेला घेतली जाईल, असेही एनबीईएमएलनं नमूद केले. देशभरीतील इतर ठिकाणी ही परिक्षा यशस्वीपणे पार पडली आहे.

**नौदल-निपुण**

'निपुण' हे पाणबुडी-सहाय्यक जहाज अर्थात 'डायव्हिंग सपोर्ट व्हेसल' आज नौदलाच्या ताफ्यात सामील होणार आहे. 'निस्तार' श्रेणीतील या जहाजाचं मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड मध्ये अनावरण करण्यात येणार आहे. या जहाजामुळे समुद्रातील आव्हानात्मक परिस्थितीत काम करणाऱ्या पाणबुड्यांना सातत्याने मदत मिळणं शक्य होणार असून, पाणबुडी बचाव मोहिमांना साहाय्य करण्याच्या भारतीय नौदलाच्या क्षमतेतही या जहाजामुळे वाढ होणार आहे.

**छत्तीसगढ-नक्षल शस्त्र जप्त**

छत्तीसगडमढील बेलपोचा-गोम्पड जंगल भागातून स्थानिक पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर स्फोटकांचा साठा जप्त केला आहे. नुकतंच आत्मसमर्पण केलेल्या एका नक्षलवादी गटाने दिलेल्या माहितीवरून, विविध सुरक्षा दलांनी संयुक्तपणे ही कारवाई केली.

**अमेरिका-इराण**

अमेरिकेच्या लष्कराने होर्मुझच्या सामुद्रधुनीतील इराणच्या रॉकेट लाँचर्सवर हल्ला केल्याची माहिती एका अमेरिकन अधिकाऱ्याने आज दिली; गेल्या एका महिन्यातील ही पहिलीच लष्करी कारवाई आहे. होरमुझच्या सामुद्रधुनीतील लराक बेटाजवळ स्फोटांचे आवाज ऐकू आल्याचे वृत्त इराणमधील काही प्रसारमाध्यमांनी दिलं आहे. लराक बेटावर झालेल्या अमेरिकन हल्ल्यात इराणचे अनेक सैनिक आणि नागरिक मारले गेले असून काही जण जखमी झाले असल्याचं इराणच्या 'रिव्होल्युशनरी गार्ड्स'ने म्हटलं आहे. याला प्रत्युत्तर दिलं जाईल असा इशारा आयआरजीसीनं दिला आहे.

**स्क्वाश**

भारताचा आघाडीचा स्क्वॉश खेळाडू अभय सिंह यानं, मलेशियातील सेरेमबान इथे झालेल्या 'तुआंकू मुरिझ अजिंक्यपद चषक' स्पर्धेचं अजिंक्यपद पटकावलं आहे. अंतिम सामन्यात अभय ने हाँगकाँग-चीनच्या हेन्री लेऊंग यांचा 3-2 असा पराभव केला. अभयने आतापर्यंत तीन वेळा या स्पर्धेचं जेतेपद पटकावलं आहे.

**श्रीलंका-क्रिकेट**

श्रीलंका क्रिकेटच्या प्रशासनात सरकारी हस्तक्षेप झाल्यामुळे, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने 2027 मध्ये होणाऱ्या महिला अजिंक्यपद स्पर्धेचं यजमानपद श्रीलंकेकडून काढून घेतलं आहे.

यजमान देशासह एकूण सहा संघांचा समावेश असलेल्या या महिलांच्या स्पर्धेच्या पहिल्या आवृत्तीचे यजमानपद श्रीलंकेकडे होतं.

**<u>महिला क्रिकेट</u>**

दुबईत सुरू असलेल्या महिलांच्या आशिया चषकाच्या वीस षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत भारताने थायलंड संघाचा 94 धावांनी पराभव करत विजयी सलामी दिली. भारताने प्रथम फलंदाजी करत 20 षटकांत 9 बाद 159 धावा केल्या. यात, शफाली वर्माच्या 64 धावांचा मोलाचा वाटा आहे. भारतीय महिला गोलंदाजांनी केलेल्या भेदक कामगिरीमुळे थायलंडचा डाव सतराव्या षटकांत 65 धावांत आटोपला. भारताच्या नंदनी शर्माने 3, श्री चरणीने 2 तर दीप्ती शर्माने सात चेंडूत एकही धाव न देता 3 बळी घेतले. शफाली वर्मा हिला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. भारताचा पुढील सामना येत्या 3 सप्टेंबर रोजी हॉंगकॉंग विरुद्ध होणार आहे.

**<u>नेपाळ</u>**

नेपाळ प्रशासनाकडून 'भोटे कोशी' नदीत पुराचा धोका असल्याचा नवीन इशारा काल जारी केला. रसुवा, नुवाकोट आणि धाडिंग या जिल्ह्यांमधील नदीकाठच्या रहिवाशांना सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. नदीतील पाण्याचा प्रवाह वाढल्यानं नेपाळच्या 'राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणा'ने  सावधानतेचा इशारा दिला आहे. बुधवारी नेपाळ-तिबेट सीमेवर अचानक आलेल्या पुरामुळे जलविद्युत प्रकल्पांच्या बोगद्यांमध्ये अडकलेल्या शेकडो लोकांना बाहेर काढण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. भारत आणि चीनमधील तज्ज्ञांसह बचाव पथकं या नागरिकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहेत. बेपत्ता असलेल्या अडीच हजार नागरिकांपैकी शेकडो लोक नेपाळच्या जलविद्युत प्रकल्पांचे कर्मचारी असल्याचे मानलं जात आहे.

नेपाळमधील पुरात आतापर्यंत 794 जणांचा मृत्यू झाला आहे. तिबेटमध्ये मृतांची संख्या 16 असून 546 लोक बेपत्ता आहेत; नेपाळमधील बाधित आठही जिल्ह्यांत पूरस्थितीमध्ये अडकलेल्यांची सुटका करण्यासाठी बचाव पथकं शर्थीचे प्रयत्न करत आहेत. नेपाळमध्ये आरोग्यविषयक आणि इतर तातडीच्या गरजांच्या मदतीसाठी, जागतिक आरोग्य संघटनेने आपत्कालीन निधीतून 1 लाख 50 हजार अमेरिकन डॉलर्सची रक्कम सुपूर्द केली आहे.

दरम्यान, नेपाळमधील भीषण पूर आणि पाणलोट क्षेत्रांतील मुसळधार पावसामुळे बिहारमधील गंडक आणि कोसी नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. नदीचा प्रवाह नियंत्रित करण्यासाठी वाल्मिकीनगर बॅरेजचे सर्व 36 दरवाजे आणि कोसी बॅरेजचे 20 दरवाजे उघडण्यात आले आहेत. तथापि, गेल्या 24 तासांत दोन्ही नद्यांची पाणी पातळी आणि विसर्गाचा प्रवाह कमी झाला आहे.

**<u>ओडिशा</u>**

ओडिशामध्ये आज पुन्हा अति-मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बरगड जिल्ह्यासाठी आणि पश्चिम ओडिशामधील अनेक जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

**<u>हवामान</u>**

छत्तीसगडमधील काही भागांत आज मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**